# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

वाचा: १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४.०३.२०२०

३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०

४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

५. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०

६. या कार्यालयाचे आदेश (उपचीटनिस) क्र.२०२०/एमएजी/कक्ष-१/कावि-५१२ दिनांक:-२५.०३.२०२०

७. या कार्यालयाचे आदेश क्र.२०२०/आव्य/कावि-१२५ दिनांक:-२४.०३.२०२०

---

क्र.२०२०/आ.व्य./कावि-१७१

दिनांक:-०१.०४.२०२०

<u>आदेश :-</u>

**विषय:** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**(सर्व दुकाने / आस्थापना (मेडिकल दुकाने/ हॉस्पिटल्स वगळून) साय. ०५.०० वाजेपर्यंतच उघडे ठेवणे बाबत.)**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूच्या (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि नांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ६ अन्वये लातूर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

त्याअर्थी मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर कोरोना कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अगत्याचे झाले असल्याने जिल्ह्यातील सर्व दुकाने/ आस्थापना, बेकरी, दुध डेअरी, दुग्धजन्य पदार्थ, किराणा माल विक्रीचे दुकाने ई. **(मेडिकल दुकाने/ हॉस्पिटल्स, तसेच संदर्भ क्र. ७ अन्वये २४ तास चालू ठेवण्यात आलेले/ व या कार्यालयाकडून २४ तास चालू ठेवण्याची विशेष परवानगी देण्यात आलेली दुकाने वगळून)** सायंकाळी ०५.०० वाजे पर्यंतच उघडे राहतील.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

<u>सदरहू आदेशाची दिनांक ०२ एप्रिल, २०२० पासून अंमलबजावणी करण्यात यावी.</u>

(जी. श्रीकांत) भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा

२. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा

**III] प्रत अनुपालनास्तव:**

१. पोलीस अधीक्षक, लातूर

२. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर

३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर

४. सर्व संबंधितास

---

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)

Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com